## नियमपुस्तिका सहा

## त्यांच्या अधीन असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजाच्या श्रेणीचे विवरणपत्र

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 'अ', 'ब', 'इ' आणि अर्थसंकल्प 'ग' (सद्यस्थितीत निधी सांकेतांक 11, 12, 21, 22, 23, 30, 40, 50, 60 आणि 70) त्याचप्रमाणे मुं.वि.पु. आणि परिवहन उपक्रमाच्या अर्थसंकल्प 'क' यांची सांविधिक लेखापरीक्षा पार पाडण्याकरिता महापालिका मुख्य लेखापरीक्षक विभागाची स्थापना करण्यात आली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विस्तारीत इमारतीमध्ये वर्ष 2012 पासून महापालिका मुख्य लेखापरीक्षकांचे मुख्य कार्यालय आहे आणि त्यांची दुय्यम कार्यालये परिमंडळानुसार आहेत. बृहन्मुंबई म.न.पा. इमारतीमधील मुख्य कार्यालयात विभाग प्रमुखांशी संलग्न सामान्य प्रशासन विभाग मुख्य इमारतीतील प्रमुख लेखापाल विभाग, अर्थसंकल्प 'अ' आणि 'ग' यांच्याशी संलग्न लेखापरीक्षा विभाग तसेच खात्याचे आस्थापना विभाग आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने आरेखित केल्याप्रमाणे म्हणजे शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरांमधील विभाग कार्यालये ही म.पा.मुख्य लेखापरीक्षकांच्या संबंधित परिमंडळ कार्यालयांशी जोडलेली आहेत. शहर विभागात असलेली विभाग कार्यालये म्हणजे अर्थसंकल्प 'अ' च्या संबंधातील विभाग 'अ' ते 'ग/उत्तर ' हे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांच्या हॉकर्स प्लाझा-दादर कार्यालय येथील शहर कार्यालयाशी संलग्न आहेत. त्याचप्रमाणे एच/पूर्व पासून आर/उत्तर पर्यंतची 'अ' अर्थसंकल्पाशी संबंधित असलेली कार्यालये महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांच्या पश्चिम उपनगर वांद्रे, अंधेरी व गोरेगाव कार्यालयाशी संलग्न आहेत आणि अर्थसंकल्प 'अ' शी संबंधित असलेले 'एल' पासून 'टी' पर्यंतचे विभाग महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांच्या चेंबूर येथील पूर्व उपनगर कार्यालयाशी संलग्न आहेत. शिक्षण लेखापरीक्षा घटक, रुग्णालय लेखापरीक्षा घटक, भांडार, परिवहन आणि मुख्य अग्निशमन कार्यालय, सुधार लेखापरीक्षा घटक हे परेल येथील परिमंडळ कार्यालयाशी संलग्न आहेत.

पाणी पुरवठा आणि मलनिःसारण विभाग लेखापरीक्षा घटकाशी संबंधित अर्थसंकल्प 'ग' खाली येणारे कामकाज जे शहर विभागाखाली म्हणजेच विभाग 'अ' ते 'ग/उत्तर' या विभागात येतात ते हॉकर्स प्लाझा-दादर कार्यालयाशी संलग्न आहेत तर पश्चिम उपनगरांमधील विभाग म्हणजे एच/पूर्व पासून आर/उत्तर पर्यंतचे विभाग कांदिवली येथील आर/दक्षिण विभाग कार्यालय इमारतीमध्ये असलेल्या कांदिवली कार्यालयाशी संलग्न आहेत आणि पूर्व उपनगरामधील विभाग कार्यालये म्हणजे 'एल' ते 'टी' विभाग कार्यालये आणि शहरबाहय कार्यालये म्हणजे कापुरबावडी, पांजरापूर इ. ही घाटकोपर येथील बाहय शहर विभागाच्या अधिन आहेत.

महापालिका मुख्य लेखापरीक्षक हे अर्थसंकल्प 'क' चे म्हणजे मुं.वि.पु.व प.उ.चे लेखापरीक्षणदेखील पार पाडतात. त्यात बॅकबे आगार पासून पश्चिम उपनगरातील दहीसर आगारापर्यंत आणि पूर्व उपनगरातील मुलुंड आगारापर्यंतच्या सर्व ठिकाणांचे लेखापरीक्षण महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभागाच्या कर्मचा-यांमार्फत पार पाडले जाते जे कुलाबा लेखापरीक्षा कार्यालयाशी संलग्न आहेत. जो पर्यंत लेखापरीक्षणाशी संबंधित आहे तो पर्यंत सर्व आगार मुं.वि.पु.प.उ.च्या कुलाबा लेखापरीक्षण कार्यालयाशी संलग्न आहेत आणि लेखापरीक्षेशी संबंधित आणि लेखापरीक्षणाव्दारे निर्मित अभिलेख सदर कार्यालयात असतात.

म.पा.मुख्य लेखापरीक्षकांचे कार्यालय लेखापरीक्षा विभाग म्हणून लेखापरीक्षा टिपण्यांव्यतिरिक्त अभिलेख उत्पन्न करत नाहीत. म.पा.मु.ले.प.विभागाशी संबंधित असलेल्या दस्तऐवज प्रवर्गनिहाय व परिमंडळीय कार्यालयानुसार पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | दस्तऐवज प्रवर्ग | दस्तऐवजाचे नाव आणि एका ओळीमध्ये त्याची ओळख | दस्तऐवज मिळविण्याची प्रकिया | व्दारा धारणाधिकार/च्या नियंत्रणाधीन |
|---|---|---|---|---|
| 1 | अ | अर्थसंकल्प 'अ','ब','इ','ग' निधी 11, 12, 21,22,23, 30,40,50,60 आणि 70 आणि अर्थसंकल्प ‘क’ लेखापरीक्षा अहवाल | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली नियत प्रक्रियेच्या अनुसरणाव्दारा अर्थसंकल्प 'अ','ब','इ','ग' च्या संबंधातील लेखापरीक्षा अहवाल महापालिका आयुक्तांकडून आणि अर्थसंकल्प 'क' चा अहवाल महाव्यवस्थापक- | अर्थसंकल्प 'अ','ब','इ' आणि 'ग' च्या संबंधातील लेखापरीक्षा अहवाल संबंधित मुख्य लेखापालांच्या अधिन असतात तर अर्थसंकल्प 'क' चा अहवाल मुं.वि.पु.प.उ.च्या एफ ए आणि सी.ए.ओ. यांच्या अधीन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मुं.वि.पु.व प.उ. यांचेकडून प्राप्त करता येईल. | असतात. |
| 2 | अ | कर्मचा-यांचे सेवा अभिलेख्, वेतनपत्रके, भविष्य निर्वाह निधी/ निवृत्ती वेतन दावे | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली नियत प्रकियेचा अवलंब करुन म.पा.मु.ले.प. विभागांकडून दस्तऐवज प्राप्त करता येतील | महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक |
| 3 | अ | मुख्य कार्यालयाशी संलग्न असलेल्या अर्थसंकल्प 'अ' विभाग 1 खालील प्रमुख लेखापाल विभागाशी संबंधित ले.प.टिपण्याची कार्यालयीन प्रत | माहिती अधिनियम अधिकाराखाली नियत प्रकियेचे अनुसरण करुन म.पा.मुख्य लेखापरीक्षा दस्तऐवज विभागाकडून प्राप्त करता येतील | लेखापरीक्षा अधिकारी (शहर) |
| 4 | " | भविष्य निर्वाह निधी / निवृत्ती वेतन दावे यांच्याशी संबंधित असलेल्या लेखापरीक्षा टिपण्यांची कार्यालयीन प्रत | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली योग्य प्रकियेचा अवलंब करुन म.पा.मु.ले.प. विभागाकडून दस्तऐवज प्राप्त करता येतील | लेखापरीक्षा अधिकारी (भ.नि.नि.घटक) |
| 5. | अ | विभाग 'अ' पासून ग/उत्तर पर्यंतच्या अर्थसंकल्प ग खाली येणा-या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रामधील लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेख यांच्या कार्यालयीन प्रती | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली योग्य प्रकियेचा अवलंब करुन म.पा.मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून दस्तऐवज प्राप्त करता येतील | उप मुख्य लेखापरीक्षक / लेखापरीक्षा अधिकारी (पापुमनि) -(हॉकर्स प्लाझा) |
| 6 | अ | विभाग अ पासून ग/ उत्तर पर्यंतच्या अर्थसंकल्प 'अ' खाली येणा-या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रामधील लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेख् यांच्या कार्यालयीन प्रती | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली योग्य प्रकियेचा अवलंब करुन म.पा. मुख्य लेखापरीक्षा विभागाकडून दस्तऐवज प्राप्त करता येतील | उप मुख्य लेखापरीक्षक / लेखापरीक्षा अधिकारी (हॉकर्स प्लाझा ) |
| 7 | अ | विभाग एच/पूर्व पासून आर/दक्षिण पर्यंतच्या अर्थसंकल्प 'अ' खाली येणा-या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रामधील लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेखांच्या कार्यालयीन प्रती | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली योग्य प्रकियेचा अवलंब करुन म.पा.मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून दस्तऐवज प्राप्त करता येतील | उपमुख्य लेखापरीक्षक / लेखापरीक्षा अधिकारी (वांद्रा) |
| 8 | अ | विभाग एल पासून टी पर्यंतच्या अर्थसंकल्प अ खाली येणा-या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रामधील | -"- | उपमुख्य लेखापरीक्षक / लेखापरीक्षा अधिकारी (चेंबूर) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेख यांच्या कार्यालयीन प्रती | | |
| 9 | अ | रुग्णालये, शिक्षण, भांडार, परिवहन आणि अग्निशमन दल कार्यालय, सुधार योजना लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेखांच्या कार्यालयीन प्रती | -"- | उप मुख्य लेखापरीक्षक / लेखापरीक्षा अधिकारी (परेल) |
| 10 | अ | विभाग एच/पूर्व पासून आर/दक्षिण पर्यंतच्या अर्थसंकल्प 'ग' खाली येणा-या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रामधील लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेख् यांच्या कार्यालयीन प्रती | माहिती अधिनियमाच्या अधिकाराखाली योग्य प्रकियेचा अवलंब करुन म.पा.मुख्य लेखापरीक्षा विभागाकडून दस्तऐवज प्राप्त करता येतील | लेखापरीक्षा अधिकारी (कांदिवली) |
| 11 | अ | विभाग 'एल' पासून 'टी' पर्यंत आणि कापूरबावडी व पांजरापूर येथील बाहय शहर विभाग यांच्या संबंधातील अर्थसंकल्प 'ग' च्या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रासंबंधातील लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेख यांच्या कार्यालयीन प्रती | -"- | उपमुख्य लेखापरीक्षक / वरिष्ठ लेखापरीक्षा अधिकारी (बाहय शहर विभाग कार्यालय घाटकोपर) / लेखापरीक्षा अधिकारी |
| 12 | अ | बॅकबे आगारापासून पश्चिम उपनगर येथील दहीसर आगारापर्यंत आणि पूर्व/उपनगरामधील मुलुंड आगारापर्यंत अर्थसंकल्प 'क' खाली येणा-या लेखापरीक्षण कार्यक्षेत्रामधील लेखापरीक्षा टिपण्या आणि इतर संलग्न अभिलेख यांच्या कायालयीन प्रती | -"- | उपमुख्य लेखापरीक्षक / लेखापरीक्षा अधिकारी - (मुं.वि.पु. आणि प.उ.) |

**(श्री. मं.सि.गोसावी)**
जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांचे कार्यालय